गांचीतुजगोडी ॥ भलादिनाचागडी ॥ घागरभरूनियां ॥ पुतळ्यातया ॥ नरहरि० ॥ ८ ॥ शिरोळग्रामींचीद्विजनारी ॥ पुत्रासमंधमारी॥ ठेवीकलेवरा ॥ औदुंबरीं॥ह्मणेपाववाश्रीहरी ॥ उठविसितात्काळ ॥ पुत्रातया ॥ नरहरि० ॥ ९ ॥ त्रिविक्रमभारथी ॥ करिनिंदा ॥ ह्मणे हादांभिकधंदा ॥ त्यासीविश्वरूप मुकुंदा ॥ दाखविसीगोविंदा ॥ नरसिंहसरस्वती ॥ गुरुराया ॥ नरहरि०॥ १० ॥ वांझमहिषीचें ॥ दुधपीसी ॥ विप्रस्त्रीसुखवीसी ॥ पतितामुखींवेद ॥ वोलविसी ॥ निज गर्वछेदिसी ॥ नकळेकवणाला ॥ तवचर्या ॥ नरहरि० ॥ ११ ॥ मोहरपुरींचा ॥ रोगपती॥ घेउनिआलीसती॥ मार्गीमरणआलें ॥ तयाप्रती ॥ करिबहूआकूलती ॥ देशीअभयतया ॥ सौभाग्या ॥ नरहरि० ॥ १२ ॥ सत्कर्माधरणीबहुश्रूत ॥ नेमेंवरिलेंचित्त ॥ परान्नभक्षाया ॥ उदीत ॥ स्त्रीबहुतळमळीत ॥ आज्ञादेउनियां ॥ दंपत्या ॥ नरहरि० ॥१३॥ तीनपात्रांचीसामुग्री ॥ ब्राह्मणभिक्षाकरी ॥ छाटीझाकुनिया ॥ अन्नावरी॥जेविलेसहस्रचारी॥कीर्तिझालीवा जगत्रया॥नरहरि०॥१४॥ साठवर्षांची ह्मातारी ॥ वंध्यापदरपसरी ॥ करुणायेऊंदेतुजनरहरी ॥ देशीपुत्रकुमारी ॥ समर्थादुःखहरावया ॥ नरहरि० ॥ १५ ॥ श्वेतकुष्ठांनींव्यापिला ॥ ब्राह्मणधांवतआला ॥ रक्षींरक्षींह्मणेदयाळा ॥ शुष्ककाष्ठद्रुमकेला ॥ निर्मळझालीवा ॥ तत्काया ॥ नरहरि० ॥ १६ ॥ तंतुकभक्तितुझी॥ करिसेवा ॥ ह्मणेपावगादेवा ॥ दर्शनश्रीशैल्या ॥ महादेवा ॥ करवीसीकेशवा ॥ मातापितातूं॥गुरुराया ॥ नरहरि०।१७। देवादिपवाळीचेदिवशीं ॥ अष्टरूपझालासी ॥ आठांघरींभिक्षा ॥ तूंघेसी ॥ दीनबंधूह्मणविसी ॥ करिसीभक्तांशींबहुमाया॥नरहरि०॥ १८॥ गाणगापुरींचाकुलवाडी ॥ मार्गीउभाकरजोडी॥ आडवापडेपुढें॥ घडोघडीं ॥ पीकहजारोखंडी॥देशीशूद्राला ॥ स्वामीया॥ नरहरि० ॥१९॥ सायंदेवपंत॥निजभक्त ॥ तवभजनींआसक्त ॥ दिधलेंतयासी॥ निजतत्त्व ॥ अशाकथाअनंत ॥ शेषादिकथकलेवा ॥ गुणगाया ॥ नरहरि० ॥ २० ॥ केवळमतिमंदमी॥ पातकी ॥ वहुजन्माचादुःखी ॥ महन्देवात्मजा ॥ करासुखी ॥ कृपादृष्टिअवलोकीं॥ ठेवाहातशिरीं॥करादया॥ नरहरि० ॥ येईयेईवा ॥ २१ ॥

**धांवा**—राग कालंगडा ताल धुमाळी.

येईंवागुरुराया ॥ मजघेपदरीं लोटेनाभवसिंधू ॥ वळियालहरी ॥ येई० ॥ ध्रु० ॥ मायेचापूरलोटे ॥ मजवाहवितो ॥ काळाचेंभयवाटे ॥ तुजआठवितों ॥ युगसमबहुकष्टींदिसघालवितों ॥ तुजसाठींउरदाटे ॥ जीवआळवितों ॥ येई० ॥ १ ॥ कोठेंनगमेदेवा ॥ हरिकायकरूं ॥ कोणातेंदुःखसांगूं ॥ गुरुकल्पतरू ॥ आतांतुजविणदत्ता ॥ कितीधीर धरूं ॥ भेटायागुणरासी ॥ तपकोणकरूं ॥ येई० ॥ २ ॥ कोणदुजाप्रणितावा ॥ प्रतिपाळकरीं ॥ तुजविरहितज्ञाननाहीं ॥ गतिवादूसरी ॥ बुडतोंयाभवडोहीं ॥ करींकोणधरी ॥ देवाश्रमझालेवा ॥ मजदुःखहरी ॥ येई० ॥३॥ योगीजननमरणा ॥ जननीजनिता ॥ देवावहुदिसझाले ॥ मजचाळविता ॥ कैसेंमजदुःखझालें ॥ शिरींतूंअसतां ॥ स्वामीतूंगुरु माझा ॥ भवउद्धरिता ॥ येई० ॥४॥ प्राणविसावामाझा ॥ हरितूंअससी ॥ सागरतूंकरुणेचा ॥ मजकांछळिसी ॥ सुरजनमुनिसकळांच्या ॥ हृययींवससी ॥ सेवकमीहरितुझा ॥ दुरिकांधरिसी ॥ येई० ॥ ५ ॥ तव विरहेंममनयनीं ॥ जळपाझरतें ॥ लवपळआयुष्यमाझें ॥ हरिहेंसरतें ॥ साधनकायकरूंमी ॥ मजनापरतें ॥ जिवलगतूंकधींयेसी ॥ मनघावरतें ॥ येई० ॥ ६ ॥ यत्नाचीहदझाली ॥ मतीहीभ्रमली ॥ नाहींधीरदयाळा ॥ वृत्तीडळमळली ॥ तवपदसेवाकांहीं ॥ मजनाहींघडली ॥ येई० ॥ ७ ॥ कैसातरीगुरुवर्या ॥ तवदासअसे ॥ नारायणात्मजविनवी ॥ पंथपहातसें ॥ स्वामीनिरंजनदत्ता ॥ पदींलागतसें ॥ येई० ॥ ८ ॥

---

## शिरोळ येथील भोजनपात्राचें वर्णन.

**पद**—पंचतुंडनर० या चालीवर.

शिरोळग्रामींसद्गुरुस्वामीआलेभोजनामाध्यान्हीं ॥ प्रगटहोउनीरूपदाविलेंपतिव्रताबहुपाहोनी ॥ ध्रु० ॥ यतिवरवेषींदत्तदिगांवरआले एकाविप्रघरीं ॥ नारायणनारायणअलखमंत्रहाउच्चारी ॥ देखुनिनयनींसतीसुंदरी आलीवेगींबाहेरी ॥ वंदुनिचरणजोडुनिपाणीउभीराहिलीतीनारी ॥ यतीबोलतीसतीद्यावीभिक्षाआह्मांपोटभरी ॥ माध्यान्हिकसमयकठिणपाहुनिआलोंमीतवद्वारीं ॥ भोजनघालीत्वराकरुनी

धीरक्षणभरनाजननी ॥ प्रगट० ॥ १ ॥ क्षुधाक्रांतमगपाहुनियतिला पतिव्रताविस्मितझाली ॥ अन्नपाकहीसमयींनाहींम्हणूनिमनींभ्याली ॥ अंतरज्ञानीदीनदयाळुपाहुनितिचीभक्तीभली ॥ सिद्धअसेलतेंवाढी मातेंचितासोडीयावेळीं ॥ हास्यमुखआणिचंद्रवदनींत्याआश्रूआलेबहु नयनीं ॥ प्रगट० ॥ २ ॥ पूजनपात्रींकरुनिस्वामिशीआसनदेउनिबैस विलें ॥ पातळकणयाविरहितनसेबासाधनकांहींगृहींबोले ॥ पूर्णपात्रतें नाहींम्हणतांप्रभुनेंअघटितजेंकेलें ॥ पाषाणाचेंपात्रकरुनीत्यावरिवाढि यतिबोले ॥ पातळकणयाआवडिप्रीतिनेंस्वस्थपणेंभोजनकेलें ॥ क्षुधा निवालीआनंदानेंआशीर्वचनतीसदिधलें ॥ दुर्बळताहीजाउनिहोईभा- ग्योदयसंतानजननी ॥ प्रगट० ॥ ३ ॥ यापात्राचीपूजाकरुनीभक्ति- भावेंभजनकरा ॥ येथेंमाझीअसेविभूतीहानिश्चयमनिंधरा ॥ शूळकुष्ठ आणिरोगभयंकरयाचानाशहोईलत्वरा ॥ यापरिसांगुनिजाताझालासं- निधवाडीकृष्णातिरा ॥ तेव्हांपासुनिनामप्रगटलेंभोजनपात्रशिरोळपुरा ॥ अनन्यभावेंपूजाकरितांभवपाशापासुनिसुटेत्वरा ॥ सीतारामाआला प्रेमाकवित्वकरावेंवाटेमनीं ॥ प्रगट० ॥ ४ ॥

**पद**—विरा भ्रमरा या चालीवर.

श्रीविधिहरिहरमूर्तिसांवळीकृष्णातिरींराहे ॥ सांवळी० ॥ दत्तदि- गांबरम्हणतीजयालाऔदुंबरछाये ॥ ध्रु० ॥ कृष्णातिरीचाअगाधम- हिमादुर्लभदेवांसी ॥ ईचेतीरींवासजयाचाअखंडहोकाशी ॥ प्रातःका- ळींसुरगणमुनिजनयेतीस्नानासी ॥ पवित्रहोउनिशुद्धभक्तिनेंसाधनमु- क्तीसी ॥ शुष्कपापेंगणतीनाहींजातीविलयासी ॥ महापापेंकरि- तांस्नानेंजातीमोक्षासी ॥ चलाजाउंयाकरातयारीसत्वरलवलाहे ॥ दत्त० ॥ १ ॥ ध्यानपहातांभगवींवस्त्रेंपरिकरलंगोटी ॥ सर्वांगीं- चर्चूनिबैसलेभस्माचीउटी ॥ दंडकमंडलुकरींघेउनियांउपवस्त्रेंछाटी ॥ रुद्राक्षांचेहारप्रफुल्लितशोभतिबहुकंठीं ॥ शमीपत्रकितीबिल्वतुळसी- दलसुमनांचीदाटी ॥ प्रेमानंदेंभक्तवाहातीआवडबहुमोठी ॥ हास्य मुखानेंकृपाकटाक्षेंदासांकडेपाहे ॥ दत्त० ॥ २ ॥ औदुंबराचीपूजाक- रितांकोटीपापांची ॥ राखरांगोळीहोउनीजायसाक्षीअंबेची ॥ अशा- वृक्षातळींबैसलीस्वारीश्रीगुरुदत्ताची ॥ तीनत्रिकाळींपूजाहोतसेश्रीगुरु

रायाची ॥ सायंकाळींअसेंवाटतेंशोभास्वर्गाची ॥ पत्रपुष्पेंअतिघोषगर्जनाचर्चावेदांची ॥ सीतारामापाहुनिप्रेमाआनंदनसमायें ॥ दत्तदिगांवर० ॥ ३ ॥

**पद**—वाडीवर्णन ( हे मना सोड कल्पना या चालीवर. )

श्रीक्षेत्रकृष्णातीरींवसेनरहरीअवदुंबरशिगें ॥ अतिघनछायाअतिघनछाया॥त्रैमूर्तिधरुनीअवतारजगींताराया ॥ ध्रु० ॥ कायसांगूंकृष्णेचाथाटसभोंवतींघाटवृक्षघनदाटशमीचेभारीशमीचेभारी ॥ त्याठायींराहिलीश्रीगुरुयतीचीस्वारी ॥ हादिव्यअमोलिकहिराविधीहरिहरामनींनिटधराभवार्णवतारिभवार्णवतारी ॥ त्रिभुवनांतऐसानसेभक्तकैवारी ॥ त्रैतापजाळितोपापनसेत्यामापपहानिर्धारिपहानिर्धारी॥ निष्कामभक्तिचेठायींमुक्तिसंसारीं ॥ चाल ॥ देउनिराज्यरजकालायाक्षिती ॥ तारिलेभक्तजनसारेनसेमिती ॥ संकटींरक्षितोभक्तांअशीस्थिती ॥ हेचरणधरुनिदृढशरणकरिलजोस्मरणअर्पुनीकायाअर्पुनीकाया ॥ त्रैमूर्ति० ॥ १ ॥ भूभारहरायासारघेउनिअवतारअत्रिच्यापोटींअत्रिच्यापोटीं॥ महाक्षेत्रवसविलीवाडिपतीतांसाठीं॥ नित्यनूतनअसेदरवींरयात्रेचाभारशोभेमहाद्वारसाधुजनदाटीसाधुजनदाटी ॥भासतेजणूहाथाटनसेवैकुंठीं ॥ कितियतीतसेचभूपतीविप्रशोभतीवेदघनपाठीवेदघनपाठी॥महासिद्धबुद्धवैराग्यसदोदितभेटी ॥ चाल ॥ ठायींठायींहरीगुणलीलावर्णिती ॥ सप्रेमयुक्तआनंदेंनाचती ॥ कितिचरित्रगुरुचेंविप्रवाचिती ॥ हेंभुवनसुशोभितसुवननसेकलिपवनपलखएकन्यायापलखएकन्याया॥त्रैमूर्ति०॥२॥ अशिपुनीतजागानसेऔदुंबरिवसेवाटपहातसेसदैवगुरुमूर्तिसदैवगुरुमूर्ती॥ कथींयेतीलमाझेभक्तवाढविनकीर्ति॥ नारायणस्वामीकरूनहातींहातधरूनप्रेमरसभरूनसमाधीवरतीसमाधीवरती ॥ देऊनितयासीमानचालवीआर्ती॥ घेउनीहातामधेंदंडउभाअखंडकरितसेदंड अधर्माचरतीअधर्माचरती ॥ भवरोगसंबंधींतुटेकामनापुरती ॥ चाल ॥ कितीपिशाच्चबाधासारीघालवी ॥ महारोगकोडकुष्ठादिमालवी ॥ खळसमंधबांधुनिस्तंभींबोलवी ॥ हाप्रतापअद्भुतजगींआलीभरयुगीअशाकलियुगींसितारामाया ॥ सितारामाय ॥ त्रैमूर्ति० ॥ ३ ॥

**शेजारती**—राग जोगी ताल धुमाळी.

आतांस्वामीसुखेंनिद्राकरागोपाळास्वामीदत्तदयाळा ॥ पुरलेमनोरथजातोंआपुल्यास्थळा ॥ आतां० ॥ १ ॥ पावलाप्रसादआतांसुखेंनिजावें ॥ आतांसुखेंपहुडावें ॥ आपुल्यालाश्रमहोतीवहुतस्वभावें ॥ आतां० ॥ २ ॥ तुम्हांजागविलेंस्वामीआपुल्याकाजा ॥ स्वामीआपुल्याकाजा ॥ शुभाशुभकर्मदोषहरावयापीडा ॥ आतां० ॥ ३ ॥ तुकाम्हणेदिधलेंउच्छिष्टाचेंभोजन ॥ उच्छिष्टाचेंभोजन ॥ नाहींनिवडिलेंएकएकभिन्नभिन्न ॥ आतां० ४ ॥

---

## ॥ काकड आरती ॥

पंचप्राणकाकडआरतितत्वात्मकज्योती॥ लावूनीतत्वात्मकज्योती०॥ वोवाळिलागुरुत्रयमूर्तीवोवाळिलाश्रीत्रयमूर्तीपरमात्माप्रीती ॥ वोवाळूंआरतीमाझ्यासद्गुरुनाथास्वामीश्रीगुरुनाथा ॥ शरणमीआलोंतुज ॥ शरणमीआलोंतुज ॥ श्रीपदींठेविलामाथा ॥ १ ॥ कृष्णासुपंचगंगाअनादिसंगमींनरहरिअनादिसंगमीं ॥ राहेगुरुवरतरुतळींराहेयतिवरतरुतळीं तोहामाझाकुळस्वामी ॥ वोवा० ॥ २ ॥ द्वारींचौघडावाजे वाजंत्रीवाजतीकर्णेवाजंत्रीवाजती ॥ नानाघोषेंगर्जतनानावाद्येंगर्जतभक्तस्वानंदेंस्तविती ॥ वोवाळूं० ॥ ३ ॥ इंद्रादिसुरवरपन्नगदर्शनासयेती ॥ श्रीचेंदर्शनासयेती ॥ नारदमुनिवरकिंन्नरतुंवरसुस्वरेंआळविती ॥ वोवाळू० ॥ ४ ॥ पाहुनिसिंहासनींआदिमूर्तीसांवळीचिन्मयमूर्ती सांवळी॥श्रीगुरुभक्ततन्मयश्रीगुरुभक्तनिर्भयपदींवोवाळी॥वोवाळूं०॥५॥

---

## ॥ अथ शरणाष्टकप्रारंभः ॥

चारुवदन प्रभु राम या चालीवर.

दत्तात्रयातवशरणं ॥ दत्तनाथातवशरणं ॥ त्रिगुणात्मकात्रिगुणातीतात्रिभुवनपालकतवशरणं ॥ १ ॥ शाश्वतमूर्तेतवशरणं ॥ श्यामसुंदरातवशरणं ॥ शेषाभरणाशेषभूषणाशेषशायीतवशरणं ॥२॥ षड्भुजमूर्तीतव० ॥ षड्भुजयतिवरत० ॥ दंडकमंडलुगदापद्मशंखचक्रधरत० ॥ ३ ॥ करुणानिधेत० ॥ करुणासागरात० ॥ श्रीपादश्रीवल्लभगुरुवर

नृसिंहसरस्वतीत० ॥ ४ ॥ श्रीगुरुनाथात० ॥ सद्गुरुनाथात० ॥ कृष्णासंगमींतरुवरवासीभक्तवत्सलात० ॥ ५ ॥ कृपामूर्तेत० ॥ कृपासागरात० ॥ कृपाकटाक्षाकृपावलोकनाकृपानिधेत० ॥ ६ ॥ कालांतकात० ॥ कालनाशकात० ॥ पूर्णानंदापूर्णपरेशापुराणपुरुषात० ॥ ७ ॥ जगदीशात० ॥ जगन्नाथातव० ॥ जगत्पालकाजगदीशाजगदोद्धारातव० ॥ ८ ॥ अखिलांतरातव० ॥ अखिलैश्वर्यातव० ॥ भक्तप्रियावज्रपिंजराप्रसन्नवक्त्रात० ॥९॥ दिगंबरात०॥दीनदयाघनात०॥ दीनानाथादीनदयाळादीनोद्धारात०॥ १० ॥ तपोमूर्तेत० ॥ तेजोराशित० ॥ब्रह्मानंदाब्रह्मसनातनाब्रह्ममोहनात० ॥११॥ विश्वात्मकात०॥ विश्वरक्षकात०॥ विश्वंभराविश्वजीवनाविश्वपरात्परात० ॥१२॥ विघ्नांतकात०॥विघ्ननाशकात० ॥ प्रणवातीताप्रेमवर्धनाप्रकाशमूर्तेत० ॥१३॥ निजानंदातव० ॥ निजपददायकातव० ॥ नित्यनिरंजनानिराकारानिराधारात० ॥ १४ ॥ चिद्घनमूर्तेत० ॥ चिदाकारात० ॥ चिदात्मरूपाचिदानंदाचित्सुखकंदात० ॥ १५ ॥ अनादिमूर्तेत० ॥ अखिलावतारात० ॥ अनंतकोटिब्रह्मांडनायकाअघटितघटनात० ॥ १६ ॥ भक्तोद्धारात० ॥ भक्तरक्षकात० ॥ भक्तानुग्रहागुरुभक्तप्रियापतितोद्धारात० ॥ १७ ॥ इतिश्रीगुरुभक्तविरचितं दत्तात्रयसद्गुरुशरणाष्टकस्तोत्रंसंपूर्णम् ॥

---

## ॥ अथ ध्यानाष्टकप्रारंभः ॥

त्रिभुवनपूर्णप्रकाशासर्वेश्वरजगदीशा ॥दत्तात्रयजयत्रैलोक्यपते॥१॥ परमात्मापरंज्योतिसद्गुरुश्रीत्रैमूर्ती ॥ दत्ता० ॥ २ ॥ मुनिजनमानसचंद्रागुरुवरधैर्यसमुद्रा ॥ दत्ता० ॥ ३ ॥ निर्गुणनिर्विकारापूर्णानंदावतारा ॥ दत्ता० ॥ ४ ॥ अवतारश्रीवल्लभनरहरित्रिभुवनींदुर्लभ ॥ दत्ता० ॥ ५ ॥ करुणानिधेकमलाक्षात्रिगुणात्मकयतिदक्षा ॥ द० ॥६॥ काषायांबरवसनासुभस्मरुद्राक्षाभरणा ॥ द०॥ ७ ॥ दंडकमंडलुकरधरषड्विधआयुधपरिकर ॥ द० ॥ ८ ॥ किरीटकुंडलमंडितषड्भूजमूर्तीविराजित ॥ द० ॥ ९ ॥ कृष्णासंगमींतरुवर ॥ श्रीमत्साह्येकगुरुवर॥

दत्ता० ॥ १० ॥ दुष्कृतकृतगुरुभक्तपदींतवकृतमुक्त ॥ द० ॥ ११ ॥ इतिश्रीगुरुभक्तविरचितश्रीदत्तात्रेयसद्गुरुध्यानाष्टकं संपूर्णम् ॥

## ॥ अथ स्तोत्रप्रारंभः ॥

पंचचामर या चालीवर.

इंदुकोटितेजकीर्णसिंधुभक्तवत्सलं॥ नंदनःसुनंदनेंदुइंदिराक्षश्रीगुरुं ॥ गंधमाल्यअक्षतादिवृंददेववंदितं ॥ वंदयामिनारसिंहसरस्वतीशपाहि- मां ॥ १ ॥ मायापाशअंधकारछायादूरभास्करं॥ आहिताक्षीपाहिश्रिया वल्लभेशनायकं॥सेव्यभक्तिवृंदवरदभूयभूयनमाम्यहं ॥ वंदयामि० ॥२॥ चित्तजादिवर्गसिद्धमंत्रतारणांकुशं ॥तत्त्वसारशोभितात्मदत्तश्रीयुवल्लभं॥ उत्तमावतारभूतकर्तुभक्तवत्सलं ॥ वंदयामि० ॥ ३ ॥ व्योमरापवायुतेज भूमिकर्तुमीश्वरं ॥ कामक्रोधमोहरंतिसोमसूर्यलोचनं ॥ कामितार्थदान- भक्तकामधेनुश्रीगुरुं ॥वंदयामि०॥४॥पुंडरीककायिताक्षिकुंडलेंदुतेजसं॥ चंडदुरितखंडनार्थदंडधारीश्रीगुरुं ॥ मंडलिकमौलिमार्तंडभापिताननं ॥ वंदयामि०॥५॥ वेदशास्त्रस्तुत्यपादआदिमूर्तिश्रीगुरुं ॥ नादकलातीतक- ल्पपादपायसेव्ययं ॥ सेव्यभक्तिवृंदवरदभूयभूयनमाम्यहं ॥ वंदयामि० ॥६॥ अष्टयोगतत्त्वनिष्टतुष्टज्ञानवारिधिं ॥ कृष्णवेणितीरवासपंचनद्यसं- गमं॥कष्टदैन्यदूरभक्ततुष्टकाम्यदायकं॥वंदयामि०॥७॥नारसिंहसरस्वती शनाममष्टमौक्तिकं ॥ हारकृत्यशारदेगंगाधराख्यस्वात्मजं ॥ धारुणीक देवदीक्षगुरुमूर्तीतोषितं ॥ परमात्मनंदश्रियापुत्रपौत्रदायकं ॥ ८ ॥ ना- रसिंहसरस्वतीशअष्टकंचयःपठेत् ॥ घोरसंसारसिंधुतारणाख्यसाधनं ॥ सारज्ञानदीर्घआयुरारोग्यादिसंपदाम् ॥ चारुवर्गकाम्यलोभवारंवारयः पठेत् ॥ ९ ॥ इतिस्तोत्रंसंपूर्णम् ॥

## रा० रा० नरहर बाळकृष्ण परांजपे परींचेकर यांनीं केलेलीं पदें.

### १ ॥ पद ॥ चाल-( दैवयोग दुर्विपाक० ).

दत्तदत्तहाचिमंत्रजपकरीमना ॥ हारिलभवसागरिच्यासर्वयातना ॥ ध्रु०

देवसाक्षनाहींऐशीमूढकल्पना ॥ भावेंस्तवनिंदत्तकरीपूर्णकामना ॥ १ ॥ अंधपंगुवधिरमूकव्यंगदेहिना ॥ वैगुणतादूरकरिलहीउपासना ॥ २ ॥ अपस्मारकुष्ठविविधदेहदारणा ॥ कष्टसाध्यव्याधिनष्टहोतितत्क्षणां ॥ ३ ॥ द्रव्यपुत्रभूकललकरिजेयांचना ॥ दत्तकृपेंपूर्णकरुनिघेतिवासना ॥ ४ ॥ अनुभवघ्यानिंदुंनकाहीचप्रार्थना ॥ नरहरमनिंदत्तध्यानयोगधारणा ॥ ५ ॥

२ ॥ पद ॥ चाल–( राम भजावा राम सदोदित. )

दत्तपदींमीगुंग ॥ निरंतर ॥ दत्तपदींमीगुंग ॥ ध्रु० ॥ भवभयसंकटदुरितनिवारी ॥ दुष्टाशाकरिभंग ॥ निरंतर ॥ १ ॥ सत्संगींमनरंगोसदोदित ॥ ऐसादेंमजढंग ॥ निरंतर ॥ २ ॥ दत्तनिरंजनिंनरहरमानस ॥ प्रेमेंहोवोदंग ॥ निरंतर ॥ ३ ॥

३ ॥ पद ॥ चाल–( साध्य नसे मुनिकन्या. )

दत्तप्रभूमनिंघ्यावा ॥ निशिदिनिंवदनींतोचिवदावा ॥ ध्रु० ॥ पाहुनिप्रभुच्याविविधस्वरूपा ॥ शांतीहोईलभवसंतापा ॥ भवरिपुमनिंजिकावा ॥ नरहरिनेंप्रभुगुण तो गावा ॥ दत्तप्रभूमनिंध्यावा ॥

४ ॥ पद ॥ चाल–

श्रीपादश्रीवल्लभयतिवर भगवन् तम हारी ॥ बुडतोंआह्मीयासंसारींतारीतारीरे ॥ दयाळावारीवारीरे ॥ ध्रु० ॥ नित्यानंदसमाधितमानसभुवनींसंचारी ॥ त्रिगुणात्मकत्रयमूर्तिदिगंबरयोगीअवतारी ॥ मुनिजनमानसहंसपरात्परदुरितानीवारी ॥ असुररक्षणींतत्परतोप्रभुदैत्यासंहारी ॥ प्रभुतोदैत्यासंहारी ॥ १ ॥ काषायांबरकटींलावुनीदंडाकरिंधारी ॥ पद्मकमंडलुशंखहस्तिंतघेप्प्रयाधिकारी ॥ चक्रपाणिकरिंगदाविराजेसजलादैत्यारी ॥ त्रिभुवनव्यापुनिउरलात्यातेंवंदीनरहरी ॥ त्यातेंवंदीनरहरी ॥ २ ॥

५ ॥ पद ॥ चाल–( भूपती खरें ते वैभव सुख सेविती. )

भूवरींकलींप्रभुदत्तादिगंबरसाचा ॥ दिगंबरसाचा ॥ जोस्मरणिंपावतोशमवितापपापांचा ॥ ध्रु० ॥ नरसिंहसरस्वतिख्यातगाणगापुरचा ॥ गाणगापुरचा ॥ मुनिवंद्यप्रभूतोदिव्यसाक्षवाडीचा ॥ चाल ॥ ह्मणुनितूंत्याशींवंदावें ॥ मानवा ॥ गुणत्याचेनिशिदिनिंगावे ॥ मानवा ॥ गुरुचरणींमनरिझवावें ॥ मानवा ॥ एकभावेंशरणचिजावें ॥

मानवा ॥ यासंसारसागरींतराणिंपंथनामाचा ॥ पंथनामाचा ॥ नरह-रीमनींतोसततध्यासश्रीगुरुचा ॥ १ ॥

६ ॥ पद ॥ राग–( सारंग. )

दत्तदिगंबरध्यानींघेतांमहापापीतेउद्धरती ॥ निशिदिनिंज्याचेनाम-स्मरणेंचित्ताहोतेबहुशांती ॥ ध्रु० ॥ दंडकमंडलुहस्तिघेउनीत्रयमूर्तीज-गींअवतरती ॥ अंधजनांशींदृष्टीदेतीपंगुसचालनदेशक्ती ॥ कुष्ठीआणि महारोगितेअपस्मृताचीतीचगती ॥ उपवासादिसेवाकरुनीअवधूतातें आकळिती ॥ दत्तभक्तहेत्यातेंभजुनीभवसागरतेझटतरती ॥ लीनदीन हानरहरियाचीप्रभुपदिंराहोचिरभक्ती ॥ १ ॥

७ ॥ पद ॥ गजल ॥

दत्तपादुकांशींव्रिदिदीनदासनरहरी ॥ अतुलमोक्षसौख्यत्यासिंदेइतूं-चिसत्वरीं ॥ घोरसंसारतापजाळितोअहर्निशीं ॥ दत्तनामस्मरणिशमे-लतोचखासझटदिशीं ॥ पद्मशंखचक्रगदादंडघेकरी ॥ कमंडलुहस्तिसा-जेभूषणापरी ॥ चर्मवसनशोभेकटिंपायींहेमपादुका ॥ रम्यमूर्तिपाहतां चित्तिदाटेकौतुका ॥ त्यागिभोगियोगीतोचिझोंपघेईमाहुरीं ॥ भक्तिने-जोस्तवनकरीनाहींत्याशीतोदुरी ॥ १ ॥

८ ॥ पद ॥ चाल—( झाली ज्याची उपवर दुहिता. )

दत्तपदाचीजोकरिभक्ती ॥ नाहींतयाशीं या कलिं भीती ॥ ध्रु० ॥ दत्तनामजेवदनिंवदती ॥ भवाब्धिच्यातेपारचिजाती ॥ अशनीं प्राश-नींभोजनिंध्याती ॥ समाधिलाउनीत्यातेंबघती ॥ समतेगामिज्याह्मण-तीजगतीं ॥ नरहरिलातीनिजअनुभूती ॥

९ ॥ पद ॥ चाल—( व्यर्थ मी जन्मलें थोर कुळीं. )

निष्ठुरकांअसेदीनजनीं ॥ पाहुंकितीतववाटमनीं ॥ ध्रु० ॥ यतिप-तितुजविणकोणजगांतरीं ॥ शमविलतापझणीं ॥ दुर्दैवाचाकळसचि-झाला ॥ नसेमजसाह्यकुणी ॥ दुर्जनसंगतितापकितीदे ॥ निशिदिनिं-मानहानी ॥ नरहरमानसिंदुधरचिंता ॥ धुमसतजैशिधुनी ॥

१० ॥ पद ॥ चाल—( नयनिं पाहिन केधवां ॥ श्रीहरी तो ).

नयनिंपाहुयातोयती ॥ श्रीगुरूतो ॥ सुंदरमोहकरूपअती ॥ ध्रु० ॥ कृष्णातटिंऔदुंबरिंराहेभक्तजनासुखहोयकिती॥ शंखचक्रकरिंगदापद्मतें त्रिशूळहस्तींशोभती ॥ काषायांबरकटिंलंगोटीकर्णींकुंडललोंबती ॥

दंडकमंडलुहस्तिंघेउनीकरविरिंभिक्षामागती ॥ तवगुणकवनींनरहरिदासाद्यावींदत्तातीव्रमती ॥

११ ॥ पद ॥ चाल—( सखयानों म्यांग मोहीला ).

प्रभुपदींचित्तजोवाही ॥ तोकायवदेलतेंहोई ॥ धृ० ॥ निजसुखाशीं विन्मुखराही ॥ सुखदुःखेंसमज्यादोहीं ॥ आपदुजाज्यालानाहीं ॥ यालागिभूवरिपाही ॥ षड्रिपूजिंकिलेदेहीं ॥ तापनचकांहीं ॥ चाल ॥ दत्तरायादेयापरिमाझेठायीं ॥ माझेठायीं ॥

१२ ॥ पद ॥ चाल–( नृपाळकोप शांतवीन मी० ).

मनाचिजावोव्यग्रता ॥ येवोशांतता ॥ दत्तपदींशुद्धमती ॥ लागोवाआतां ॥ दुष्टव्यापसकलतापनष्टहोउनी ॥ यतीपती ॥ अशीमती ॥ मजशिदेइतूंहृदयींसदयता ॥

१३ ॥ पद ॥ चाल–( मनमोहन वाजवी वेणु० ).

गुरुधांवतसत्वरियेवो ॥ गुरुधांवतसत्वरियेवो ॥ ध्रु० ॥ मलाचित्याविणसंकटसमयींअन्यचिनाहिंपहाहो ॥ भक्तजनांचेंसुखधामचितो झडकरिमजतेंदावो॥ दत्तदिगंबरयतिवरश्रवणींफोडितनिंशिदिंनिटाहो॥ नरहरमानसभवसुखविन्मुखाचिरसुखत्याझणिंदेवो ॥

१४ ॥ पद ॥ चाल–( लंबोदरगिरिजानंदना ).

श्रीयतिवरमुनिमनरंजना ॥ दावीनिजपदयाजनां ॥ ध्रु० ॥ तनमनअर्पुनित्वत्पदचिंतन ॥ दर्शनत्यातमहारिणा ॥ हेंमनचंचलतमसयकेवळ ॥ शांतीद्यावीयामना ॥ नरहरमानसचिंताव्याकुल ॥ हारीसारिदयाघना ॥

१५ ॥ पद चाल–( परि शिवा न लावी हात मला ).

धी सदा रमोहीदत्तपदीं ॥ परनारमनींनचयेवोकधीं ॥ ध्रु० ॥ अकार्यींतीनचवळोंचिजलदीं ॥ हेंद्यावेंगुरुराय ॥ धी० ॥ कृपाजलाचा तूंरेउदधी ॥ तृषार्तबघतांकांरेअवधी ॥ नरहरमानसींचिंताव्याधी ॥ वारीतीयतिराय ॥ धी सदा० ॥

[stamp]

## [ श्री औदुंबर येथील शनवारचे पालखीचें वर्णन ]

॥ पद ॥ चाल–( उद्यां बघ जातें ).

पहावीसाची ॥ स्वारीयायोगीशाची ॥ ध्रु० ॥ प्रतिशनिरात्रींभक्तजनांना ॥ उल्हासचितोमनिंआवरेना ॥ स्वच्छकरोनीठेवितियाना॥ प्रीतिसेवेची ॥ यतिवरत्यानरसिंहाची॥ नरसिंहाची ॥ १ ॥ यानारोहणप्रभुनींकेलें ॥ भक्तांनींतेंस्कंधींधरिलें ॥ सुदीपउज्ज्वलत्यांनींकेलें ॥ चोपदाराचीलल्कारीयाअवधूताची ॥ अवधूताची ॥ २ ॥ सुस्वरवाद्यध्वनींतेधवले ॥ झनूझनूठणूठणूधिनूधिनूताले ॥ झांझाझंकटमृदंगबोले ॥ मौजभजनाची ॥ गर्दीबहुपाहणारांची ॥ पहाणारांची ॥ ३ ॥ स्तुतिपरपद्येंकोणीह्मणती ॥ निजकवनातेंकोणीगाती ॥ दत्तदत्तकुणिस्वमुखेंवदती ॥ वाटमोक्षाची ॥ लीलाहीऐकाप्रभूची ॥ ऐकाप्रभूची ॥ पाहवीसाची ॥ ४ ॥

॥ पद ॥ **संस्कृत** ॥ चाल–( कालिदासकृत नमोभक्त ).

नमोदत्तसुरवरगुरोपापक्षालिन् ॥ अत्रिनंदनप्रभोप्रणवधारिन् ॥ ॥ ध्रु० ॥ दंडधारिन्करे । कर्मस्वामिन्कलौ । भस्मभूषितगदाचक्रपाणे ॥ शंखडमरूकरे । रक्तवर्णाधर । कोटिसूर्यप्रभारूपधारिन् ॥ १ ॥ पंचभूतात्मक । त्रिगुणरूपात्मक । व्याप्यव्यापकस्थलेभाग्यशालिन् ॥ दिव्यपद्मंकरे । चर्मवेष्टितवपुः । सव्यहस्तस्वरात्रिशुलधारिन् ॥ २ ॥ कामशत्रोहरे । वेदविद्धेमुने । रुद्रमालाधरसौम्यकंठे ॥ भक्तवत्सलसदा। मृत्युलोकेइह । देहिसंपद्विभोबालसूनवे ॥ ३ ॥

१८ ॥ पद ॥ चाल–( सदर ).

नमावंद्यसुरवरप्रभूदत्तस्वामी ॥ अत्रिनंदनगुरूस्मार्तगामी ॥ ध्रु० ॥ दंडज्याचेकरींचंद्रशोभेशिरीं ॥ पद्मधारीगदात्रिशूलहस्तीं ॥ भस्मभूषिततनूरुद्रमालागळीं ॥ स्नानगंगोदकींकाशिग्रामीं ॥ १ ॥ कर्णिकुंडलप्रभाभक्तकार्यांउभा ॥ योगिमुनिजनसभाप्रमुखसाजे ॥ व्याघ्रचर्मेंकटींवासकृष्णातटीं ॥ ऊष्णकालींउटीदेहींनामी ॥ २ ॥ त्रिगुणरूपीयतीअगम्यज्याचीकृती ॥ जननित्याचीसतीअत्रिभार्या॥ राहेऔदुंबरीं॥ भक्तपावनकरी ॥ गुंगनरहरसदादत्तनामीं ॥ ३ ॥

१९ ॥ पद ॥ चाल–( रमवाया जाऊं प्रियासी ).

यतिरायांपाहूं ॥ चलाहो ॥ यतिरायापाहूं ॥ ध्रु० ॥ कृष्णातटिं-औदुंबरिंराहे ॥ भक्तजनांचीकाळजीवाहे ॥ ऋद्धिसिद्धीत्याजवळीं आहे ॥ शरणत्यासजाऊं ॥ चलाहो ॥ १ ॥ काषायांबरकटिंलंगोटी ॥ पांघरलातोभगवीछाटी ॥ भक्तजनांचीमंदिरिंदाटी ॥ नमुनित्याशिविनवूं ॥ चलाहो ॥ २ ॥

॥ पद ॥ चाल–( परिणिलें नमुनि कन्येला ).

त्रयमूर्तिरूपिंजोनटला ॥ विधिहरिहरएकचिवटला ॥ यतिपती ॥ ॥ ध्रु० ॥ ओंकारप्रणवतेंज्याला ॥ अनुरूपनांवसार्थाला ॥ मुनिवरा॥ कलियुगींस्वामीअवतरला॥ द्विजकर्माशिक्षकझाला ॥ नरहरी॥ चाल॥ हादत्त ॥ त्यासजेभक्त ॥ भावमनींव्यक्त ॥ करितीस्तवनाला ॥ पावे त्यांनिश्चयेंसकळांला ॥ श्रीपती ॥

२१ ॥ पद ॥ चाल–( सुकुमार असुनि तूं फार केवढी छाती ).

तेब्रह्मधर्मआणिकर्मनसेज्यावर्मह्मणतिवेदांती ॥ ह्मणतिवेदांती ॥ सरळजनमनांव्यर्थपाडितीभ्रांती ॥ ध्रु० ॥ हावादद्वैतसंवादनसेज्यादादनित्यवडवडती ॥ नित्यवडवडती ॥ शशिमुखप्रेक्षणींश्वानापरिरडती ॥ १ ॥ येपरीहोतमस्करींज्ञानतिलभरीनसेज्यांकाहीं ॥ नसे ज्यांकांहीं ॥ मुनिअगम्यत्याचाअंतलागलानाहीं ॥ २ ॥ जेंतत्त्वपूर्णगूढत्वत्यांतूनीसत्वकाढूंहेह्मणती ॥ काढूंहेह्मणती ॥ निजकालदवडुनीव्यर्थझटपटती ॥ ३ ॥ जेंनाममोक्षसुखधामज्यांतआरामसुखींनचघेती ॥ सुखींनचघेती ॥ निजधर्मविसरुनीअंतींतळमळती ॥ ४ ॥ गुरुदत्तप्रिय ज्यांभक्तनामिंआसक्तव्हांकीतेह्मणती॥ व्हांकीतेह्मणती ॥ नामएकब्रह्मसेखगितेमधेंगाती ॥ ५ ॥ नरहरीदत्तअंतरींव्याप्यभूवरींतोविंसागरीं पाहितोजगतीं ॥ पाहितोजगतीं ॥ त्यापुढें सकलहेंवादलटपटती ॥ ६ ॥

२२ ॥ पद ॥ चाल–( या पैशामध्यें० ).

श्रीयतिवरचरणांप्रेमेंनिशिंदीनिंभजतां ॥ सुखवैभवशांतीपूर्णपणेंये हातां ॥ ध्रु० ॥ जोसकलजगाचाआदीदेवताता ॥ ज्यासुरवरकिन्नर दमलेसुस्वरगातां ॥ १ ॥ ज्यायोगीश्रमतीसमाधीलाउनिपाहतां ॥ अतिरम्यस्वरूपाद्दावीतोनिजभक्ता ॥ निजभक्तजनांचाभावखरामनिंबघ-

ता ॥ प्रभुदर्शनदेउनिहारीनरहारिचिंता ॥ ३ ॥

२३ ॥ पद ॥ चाल–( गुरुदत्तदिगंबर वनमो ).

अवधूत, निरंजनमूर्ती ॥ पाहतांमनींहोशांती ॥ अवधूत ॥ ध्रु० ॥ जटामुगुटशिरिंपायिंखडावाव्याघ्रचर्मकटिंभोंवतीं ॥ त्रिपुंड्रभाळींभस्मविराजेसर्वांगावरती ॥ १ ॥ दंडकमंडलुचक्रहास्तिंप्रेमुनिवरज्यामानिं ध्याती ॥ वामिशंखकरिंगदाविराजेडमरूवाजविती ॥ २ ॥ वेदचतुष्टयश्वानहोउनीप्रभुपदिंसेवाकरिती ॥ ऋद्धिसिद्धीत्याकामधेनुहीलोळति चरणावरती ॥ ३ ॥ त्रिगुणात्मकगुरुदत्तदिगंबरविधिहरिहरत्रयमूर्ती ॥ ध्यानपाहुनीनरहरवंदीऐसाप्रभुजगतीं ॥ ४ ॥

२४ ॥ पद ॥ चाल—( भजरे भजरे भजरे मानवा ) ॥ भुपाळी ॥

उठीरेउठीरेउठीरेसद्गुरुदत्तजगजेठी ॥ तूं उठिरे० ॥ पाहूंदेचरणां तुझियादर्शनींमहिमामोठी ॥ ध्रु० ॥ चाल ॥ रक्तवर्णनभींहा दिसला॥ अरुणोदयवघरकींझाला ॥ दीपकांतीझालीधवला ॥ देईतूंमजलाभेटी ॥ ॥ १ ॥ कुक्कुटेंध्वनिरवकेला ॥ पंचपंचउषःकालाला ॥ भक्तसंघदर्शनाआला जागृतहोत्यांचेसाठीं ॥ २ ॥ सुरवरहेंआलेकोटी ॥ मंदिरीं झालिवघदाटी ॥ दर्शनींआसत्यापोटीं ॥ झडकरीऊठपरमेष्ठी ॥ ३ ॥ नरहरीकरीकवनाला ॥ वंदनींप्रभुपदसजला ॥ उठुनियादावितेत्याला ॥ उगिंचकांकरिशीखोटी ॥ ४ ॥

२५ ॥ पद ॥ चाल–( सुंदरमुखतुंदिलतनुनंदिकेश्वरा ).

त्रिगुणात्मकत्रयमूर्तीदत्तगुरुवरा ॥ मुनिजनतपसर्वयोगध्यानसंचरा ॥ ध्रु० ॥ चाल ॥ अश्रउश्रमश्रइतिप्रणवधारिणा ॥ सत्वरजस्तमश्चेतिप्रकृतिरूपिणा ॥ विधिहरिहरत्रयमूर्तीअत्रिनंदना ॥ येई । पाहीं। कांहीं । सुखिमजला । मनिविटला । जगिंफसला । हेदिगंबरा ॥१॥ त्रिगुणा० ॥ कलिमाजींतूंचिएकज्योतजागृती ॥ वाडिक्षेत्रिंवासकरुनिभक्तरक्षिती ॥ पिशाचबालउन्मत्तशीज्याअसेस्थिती ॥ श्रमलों । दमलों । भ्रमलों । तवचिंतनिं । अघनिरसनिं । मीनिशिदिनिं । पाव यतिवरा ॥ २ ॥ योगेश्वरब्रह्मवृंदवंद्यसुरवरा ॥ भक्तकाजकल्पद्रुमसत्वसागरा ॥ औदुंबरिंवासतसागाणगापुरा ॥ देवा । धांवा । पावा । गुरुदत्ता । प्रियभक्ता । तवसत्ता । दाविनरहरा ॥३॥ त्रिगुणा०॥

# श्रीदत्त अवताराची भूपाळी.

चाल—( घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ).

त्रिगुणात्मकत्रयमूर्तिमुनीवरस्वामीअवतरती ।। भक्तकामनापूर्णकरायाकलिंएकचिदिसती ।। ध्रु० ।। एकेकालींमुनिवरनारदबोलेमातेशी ।। त्रिलोकभ्रमणिंचमत्कृतीमींपाहिलीखाशी ।। हिंडतगेलोंमृत्युलोकिंमी अत्रिआश्रमाशी ।। नाहिंदेखिलीपतिव्रतामीअनुसूयाजैशी ।। चाल ।। हरिणबालकेंदिसती ।। गोजिरींतेथरमती ।। शिष्यतेतपाचरती ।। ऋषींच्यासेवनांझटती ।। अतिथिजेआश्रमींयेती ।। तयांशींअर्घ्यपाद्य देती ।। तयांत्तींपूजनेंकरिती ।। यथेच्छाभोजनांदेती ।। स्नानकरोनी विधिहरिहरतोनित्यमनींध्याती ।। १ ।। तेथुनिगेलाविधिसुतमगतो कैलासावरती ।। नमुनिगौरिलाबोलेतिजलाव्यर्थचितुह्मीजगतीं ।। मृत्युलोकिंचीअत्रिपत्नितीअनुसूयाख्याती ।। ऐशीपतिव्रतानाहिंदेखिली त्रयलोकावरती ।। चाल ।। गिरिजेसकोपआला ।। बोललीब्रह्मकुमरा ।। सांगूनिधूत्तशंकरा ।। हरिनरेतिचामीतोरा ।। धरुनियाहट्टमीअसला ।। आणिनरेरागशंभूला ।। लावीनसत्वहरायालापतीममचिशिव भोला ।। जातोआतांथेथुनिअंबेवैकुंठावरती ।। भक्तकामनापूर्णकरायाकलींएकचिदिसती ।। २ ।। लक्ष्मिसवंदुनिकथासांगेतोभूतलावरची ।। सतीपतिव्रताअत्रिपत्नितीएकचिजगिंसाची ।। तिजसमनाहींअन्यकोणिगेसाध्वीशीलाची ।। अनुसूयेचेंतेजपाहतांगाळणदेवांची ।। चाल ।। अंतरींप्रसरझाला ।। मत्सरेंकोपवरिला ।। बोललीरमामाधवाला ।। चलावेंसत्वहरायाला ।। सावित्रीउमाकमला ।। अंतरींहोतीविमला ।। साध्विचेंसत्वहरायाला ।। धाडिलेंआश्रमींपतिला।।ब्रह्माविष्णुमहेशतिन्हीद्विजरूपेंघेती ।। भक्तकामनापूर्णकरायाकलिंएकचिदिसती ।। ३ ।। अतिथित्रयतेभुवनिंपातलेअत्रिआश्रमाशी ।। तिथेंपाहिलीज्ञानदृष्टिनें अनुसूयातैशी ।। इच्छाभोजनवाढआम्हांतेंनग्नहोऊनीकशी ।। नाहिं तरिजाऊंसत्वहरोनीआपुल्याग्रामाशी ।। चाल ।। अनुसूयानग्नझाली ।। वाढण्याशीघ्रसजली ।। वाढितांस्वबालकाला ।। लाजरेकैचीमातेला ।। बोलताअतिथितेझाले ।। तान्हुलींसुबकतींबाळें ।। दाउनीस्वरूपतेंआपुलें ।। साध्विलावरचितैंदिधले ।। नरहरगायीविधिहरिहरतोएकचि

त्रयमूर्ति ॥ भक्तकामनापूर्णकरायाकलिंएकचिदिसती ॥ ४ ॥

## श्रीचे बीजांत पूजेचें पद.

चाल—( नीरक्षीरालिंगन रूपी० ).

ब्रह्मस्वरूपाश्रीयोगीशादत्तगुरुच्यापदयुगुलां ॥ वंदूनिपूजनबीजें करितोंवुद्धीघ्याप्रभुकवनाला ॥ ध्रु० ॥ पृथ्व्यात्मकत्यालंबीजानेंदाउनिअंगुलिमुद्रेला ॥ सुगंधगंधापरिकल्पींमीलेपातेनिजदेहाला ॥ आकाशात्मकहंबीजानेंअंगुष्ठाचेमुद्रेला ॥ दाउनिपुष्पेंपरिकल्पींमीघ्यावीप्रभुतींवासाला ॥ वायवात्मकयंबीजानेंदाउनितर्जनिमुद्रेला ॥ धूपादेवापरिकल्पीतुजसमाधिलावाध्यानाला ॥ तेजसात्मकरंबीजानेंस्पर्शुनिमध्यमबोटाला ॥ सुदीपउज्वलपरिकल्पींमीघ्यावेंमानुनिभक्तीला ॥ अमृतात्मकवंबीजानेंअनामिकाग्रींस्पर्शीला ॥ नैवेद्यामीपरिकल्पीतुजग्रहणकरावेंखाद्याला ॥ सर्वशक्तिस्वरूपआत्मकसंबीजेंसर्वांगुलिलां ॥ स्पर्शुनिसारेउपचारादिकल्पींराजांचेंतुजला ॥ अंगुलिमध्यमअंगुष्ठांतेंएककरोनीउभयकरा ॥ अनामिकेशींअनामिकातींतर्जनितेवींतर्जनिला ॥ अनंतकोटिनमनकरीतोंदत्ताद्दाऊनिमुद्रेला ॥ सुबुद्धिदेउनिशेवटकेलादत्तानरहरिकवनाला ॥

२६ ॥ पद ॥ चाल–( वारी संकट हरि दामाजीचें० ).

भजरेभजमनुजासद्गुरुस्वामी ॥ होईलआरामी । दत्तपायिंसुखहोइसदोदितवंदुनियाघेलाय्कहामी ॥ ध्रु० ॥ काषायांबरभगवीछाटी ॥ नेशीलंगोटी ॥ दंडाधरितोजैशीकाठी ॥ कांतीरविकोटी ॥ त्रिशूलडमरूकरिंपंञ्चसाजतेंचक्रशोभतेंनामी ॥ १ ॥ ऐसासद्गुरुयतिवरराणा ॥ अवनतभयहारणा ॥ भक्तांतारणिज्याचाबाणा ॥ जोहोयपुराणा ॥ औंदुबरिंनरसिंहसरस्वतिभक्तकाजकल्पद्रुमनामी ॥ २ ॥ नाना व्याधिततत्पदिंयेती ॥ हेमतनूबनती ॥ ऐशीप्रभुचीआहेख्याती ॥ घ्यावीअनुभूती ॥ भावखराजरिहोयदिगंबरिपाहुनिसत्वरिंनेनिजधामीं ॥ ३ ॥ जींजींगतजन्मींदुरितेंघडली ॥ तींसारींजळलीं ॥ शंका मानसिंनाहींउरली ॥ गुरुमहिमाकळली ॥ दत्तपदींनिजकालदवडितीघ्यासदातोहोयसुकामीं ॥४॥ प्राण्यासद्गुरुचीसेवाकरणें॥ शुद्धांतः-

करणें ॥ स्मरणेंप्रभुदत्तासंसृतितरणें ॥ सत्कर्माचरणें ॥ समजहृदयिं झटउमजअंतरिंजपनिशिदिनितोप्रतियामीं ॥ ५ ॥ ऐशाकृतिनें वहुजन तरले ॥ शांतीलामिळले ॥ पुनरावृत्तीजननांटळले ॥ निजपदितेगेले॥ कवानिंभजननरसिंहकरुनियागुंगसदातोयतिवरनामीं ॥ ६ ॥

## ॥ पद ॥

चाल—( ना दे चित्ता शांती ऐशी विद्या काशाला ).

श्रीपादश्रीवल्लभयतिवरसुखवरदेमजला ॥ यास्तवदत्तादीनदयाळा नमितोंमीतुजला ॥ ध्रु० ॥ त्रिगुणात्मकअवधूतदिगंबरदत्तात्रयमूर्ती ॥ कृष्णातटिऔदुंबरिराहेऐशीहोख्याती ॥ अश्वउश्वमश्वऐसेप्रणवरूपवारि- ती ॥ सुष्ठरक्षुनिशासनकरिशीदेवातूंचिखला ॥ १ ॥ नाहींविद्याकला कैसारिझवूंमीतुजला ॥ वटवटनिशिदिनितवनामाचीकरणींहासजला ॥ शुद्धमधुरहीवाणीनाहींप्रभुतुजगायाला ॥ कितिविनवूतुजअझुनिनकांये घामचिरेतनुला ॥ २ ॥ नमोनमस्तेअत्रिनंदनायतिवरसुखदाता ॥ न- मोनमस्तेमुनिजनमानसतापासंहर्ता ॥ नमोनमस्तेसचिद्रूपाभूवनत्रयक- र्ता ॥ थकल्यानरहरफसलापाहीसाक्षीतूंसकलां ॥ ३ ॥

---

## आरती श्रीगुरुदत्तात्रयाची.

त्रिगुणात्मकत्रैमूर्तीदत्तहाध्यान ॥ त्रिभुवनीं आधारत्रैलोक्यजाण ॥ नितिनितिशब्दनाहिअनुमान ॥ सुरगणमुनिजनयोगेसमाधलेंध्यान ॥ जयदेवजयदेवजयश्रीगुरुदत्ता ॥ आरतीओवाळिताहारसीभवचिंताज- यदेवजयदेव० ॥ १ ॥ सवाह्यअभ्यंतरींतूंएकदत्त ॥ अभाग्याचेकैसी नकळेहीमात ॥ पराहीपरतरीकैसाहेहेत ॥ जन्ममरणाचापुरलाअंत ॥ जयदेवजयदेव० ॥ २ ॥ दत्तदत्तऐसेंलागलेंध्यान ॥ हारपलेंमनझालें उन्मन ॥ मीतूपणाचीझालीउसण ॥ एकाजनार्दनींश्रीदत्तध्यान ॥ जयदेवजयदेवजयश्रीगुरुदत्ता ॥ आरतीओवाळीतांहारसीभवचिंता ॥ जयदेवजयदेव ॥ ३ ॥

---

# श्रीक्षेत्र नरसिंहवाडीचें वर्णन.

कोणाचेंही वर्णन तें मोठ्या शहरचें असो, क्षेत्राचें असो, किंवा मनुष्याचें असो अथवा ईश्वराचें असो, प्रथम कोणत्याही मनुष्याची उत्कट इच्छा त्यांच्या त्याच्या आदिवस्तीविषयीं किंवा जन्माविषयीं असते. आतां ईश्वराविषयीं म्हटलें तर तो अनन्यजन्मा आहे, ह्मणजे हें नाम ऐकतांक्षणींच मनुष्याच्या अंतःकरणांत त्याचेविषयीं पूज्यता उत्पन्न होतेच. त्याचप्रमाणें आमचें हें श्री क्षेत्र नरसिंहवाडी हिच्या वस्तीविषयीं आहे. ह्मणजे हिच्या वस्तीबद्दल कोणताही काल ठरवितां येत नाहीं. ह्मणूनच हें स्थल फारच पूज्य व मनोरम मानिलें आहे. ज्यावेळीं श्रीनरसिंहसरस्वती येथें आले त्यावेळीं हा प्रदेश अरण्यमय होता अशी दंतकथा आहे.

हें क्षेत्र कोल्हापूर संस्थानापैकीं शिरोळपेठ्यानजिकच सुमारें दोन मैलांवर आहे. ह्या क्षेत्राचें आसपास जवळचें मोठें शहर ह्मटलें ह्मणजे सांगली, ह्मणूनच आह्मीं ( विष्णु रघुनाथ आणि मंडळी ) ह्या शहरीं आपलें आफीस स्थापन केलें आहे. व येथील श्रीमंत सरकार हे फारच दयाळु, न्यायी, व देवतांविषयीं पूज्यबुद्धि ठेवणारे आहेत. व ह्यांचे मुत्सद्दी चांगले असल्याकारणानें आमच्या ह्या संस्थेस चांगलें स्वरूप मिळालें व आमचे हेतु शेवटास गेले. व त्यांच्याच परवानगीनें श्रीमंत धुंडिराज चिंतामण उर्फ तात्यासाहेब सरकार सांगली यांस त्यांच्या ६० वे वर्षाच्या वाढदिवसाचे मोठ्या आनंदाच्या दिवशीं वरील मंडळीचे म्यानेजर रा० आण्णाजी कृष्ण पुजारी वाडीकर ह्यांनीं दरबारचेवेळीं **मान**पत्र अर्पण केलें. त्यावेळेस त्यांचे सर्व मुत्सद्दी मंत्री आदिकरून मंडळी यांनीं दरबार सुशोभित केला होता आणि श्रीमंतांच्या वतीनें त्यांचें मुख्य मुत्सद्दी रा० ब० कारभारीसाहेब मोहनीराज एकनाथ यांनीं मंडळीचें आभार मानिले.

ह्या क्षेत्राचें आग्नेयेदिशेस थोड्याच अंतरावर कृष्णा आणि पंचगंगा या दोन नद्यांचा संगम झालेला आहे. परमपूज्य श्रीगुरुचरित्रांत असें वर्णिलें आहे कीं, त्या ठिकाणीं अमरेश्वर ह्मणून देव आहे व त्याच्याजवळ ६४

योगिनी असून तेथें शक्तितीर्थ आहे अशा या पुण्यक्षेत्रीं स्नान केलें असतां सहजच मनुष्यास आनंद होऊन सर्व रोगांचें पर्यवसान होतें. श्रीदत्तात्रयाचें मुख्य स्थानाचे उत्तर बाजूस श्रीकृष्णेच्या पश्चिमवाहिनीचे प्रवाहास शुक्लतीर्थ असें ह्मणतात. आणि त्याचे खालील बाजूस पापविनाशीतीर्थ, काम्यतीर्थ, सिद्धवरदतीर्थ, प्रयागतीर्थ, शक्तितीर्थ, अमरतीर्थ व कोटीतीर्थ अशीं अष्ट तीर्थें मुख्य असून याशिवाय या पुण्यक्षेत्रीं अगणित तीर्थें आहेत. अशा या तीर्थांमध्यें स्नान केलें असतां पुण्य लागतें किंवा नाहीं, पापविनाश होतो किंवा नाहीं, ह्याची शंका घेण्याचें कोणत्याही प्रकारचें कारण दिसत नाहीं. ह्मणून यात्रेकरु या ठिकाणीं स्नान करून पुण्यप्राप्ति करून घेतात आणि त्यांतून कन्यागतीं स्नान केलें असतां अमित पुण्य लागतें. तेव्हां असें हें क्षेत्र दक्षिणहिंदुस्थानामध्यें दुसरी काशीच आहे आणि उत्तर हिंदुस्थानांतील गंगा व यमुना ह्यांचे संगमावरील जसें प्रयागस्थान तसें दक्षिणेंतील कृष्णा व पंचगंगा ह्यांचे संगमावरील नरसिंहवाडी हें पवित्र स्थान आहे. यासाठीं या ठिकाणीं आलें असतां काशी व प्रयाग या यात्रेचें श्रय मिळतें.

हें क्षेत्र नद्यांस पूर आला ह्मणजे केवळ बेट बनतें, त्यावेळेचा देखावा रमणीय व प्रेक्षणीय असतो. ह्या वेळेस कृष्णारूपी समुद्रामध्यें नावा आगबोटीप्रमाणें क्रीडा करितात कीं काय असा भास होतो. कृष्णाबाई श्रीदत्ताचे मुख्य स्थानास भेट देते ह्मणजे प्रवाह पादुकांवरून दक्षिणेस जातो त्यास दक्षिणद्वार असें ह्मणतात. ह्यावेळीं भाविक लोक तेथें स्नान करून ब्राह्मणास दक्षणा देतात.

हें क्षेत्र असल्याकारणानें पुष्कळ लोक परठिकाणांहून श्रीदत्तात्रयाचे दर्शनास येतात. ह्यांस रहाण्यासाठीं पृथक् जागा ह्मणजे ( धर्मशाळा ) नसल्याकारणानें पुजाऱ्यांच्या घरांतच रहाणें भाग पडतें. तेव्हां उदार व श्रीमंत लोकांस ग्रंथकर्त्याची अशी सविनय प्रार्थना आहे कीं, या क्षेत्रीं येऊन भोजन इत्यादिकांत जास्त खर्च करण्यापेक्षां सर्व लोकोपयोगीं व सतत रहाणाऱ्या अशा कृत्याकडे खर्च केला असतां जास्त श्रेयस्कर होईल व अशा कृत्यापासून यात्रेकरूंस व त्यांतून गरीब लोकांस फारच सुख होईल. व याबद्दल त्यांसही दत्तकृपेनें सदा सुख मिळेल अशी आशा आहे.

या क्षेत्राचे ठिकाणीं बहुतेक प्रकारचे सोईवार असे पदार्थ मिळतात.

या क्षेत्रीं अन्नदान घडावें ह्मणून कांहीं पुण्यपुरुषांनीं अन्नसत्रें घातलीं आहेत व ह्या पुण्याईची उतराई त्यांस होत आहे.

१ श्रीमन्महाराज छत्रपती सरकार करवीर

यांच्या सत्रांत प्रत्येकास एक एक भाकरी मिळते.

२ श्रीमंत सांगलीसरकार

यांच्या सत्रांत प्रत्येकास एकेक मूद भात आणि सांबारें मिळतें.

३ श्रीमंत मिरजकर वडिल घराणें

यांच्या सत्रांत प्रत्येकास एक एक मूद भात व लहान भाकर मिळते.

४ श्रीमंत मिरज मळा

यांच्या सत्रांत प्रत्येकास दोन वाट्या ताक मिळतें.

५ इचलकरंजीचे प्रसिद्ध सावकार दाते

यांच्या सत्रांत प्रत्येकास एकेक मूद भात मिळतो.

अशा रीतीनें सेवेकरी गरीब लोकांचा चांगल्या रीतीनें निर्वाह होऊन ते अन्नदात्याचें अंतःकरणापासून कल्याण चिंतितात.

येथें महारोगानें पीडित असे सुमारें शंभर सवाशें लोक आहेत व त्यांचा निर्वाह वरील सत्रांत होतो.

या लहानशा टुमदार क्षेत्रास तीन घाट आहेत.

१ कृष्णा व पंचगंगा यांचे संगमावरील.

२ श्रीगुरु दत्तात्रयाचा.

३ श्रीच्या देवालयाच्या उत्तर बाजूचा.

दुसऱ्या घाटाच्या वरच्या चवथऱ्यावर श्री दत्तात्रयाचें लहानसें देवालय आहे. ह्या देवालयाचा आकार ( घुमट ) बादशाही थाटाचा आहे व श्रीचे पादुकांवरील वस्त्रही त्याच रिवाजाचें आहे. ह्यावरून व श्रीगुरुचरित्रांत सांगितल्यावरून असा तर्क निघतो कीं, म्लेंच्छादि इतर जातीही श्रीचे ठिकाणीं पूज्यता ठेवून भक्ति करीत असत. हल्लीं जे आपणास (हिंदु आणि यवन ) हाल सोसावे लागत आहेत व दारिद्र्यावस्थेंत रहावें लागत आहे. ह्याचें जर कारण हुडकूं गेलें तर असें आढळून येईल कीं, आपणांमध्यें भक्तीचा नाश झालेला आहे. दुसरा घाट एकनाथमहाराजांनीं श्री जनार्दनस्वामींच्या आज्ञेवरून बांधिला. एकनाथ महाराजांचें मूळ ठिकाण

सांगली संस्थानांतील म्हैसाळ हें होय. ( हिंदुस्थानचा अर्वाचीन कोश ) हा गांव येथून जवळच आहे.

ह्या क्षेत्रीं श्रीगुरूचे पादुकारूपीं साक्षात् वास्तव्य असल्यानें अनेक प्रकारचे चमत्कारिक साक्षात्कार लोकांच्या अनुभवास येतात व तत्क्षणीं आधुनिक विद्वान लोकांची देवाच्या अस्तित्वाविषयींची खात्री होते. संध्याकाळीं धूपारतीच्या वेळेस जेव्हां दत्तनामाचा गजर होतो, व वाद्याचा ध्वनी चालतो, जिकडे तिकडे लखलख प्रकाश पडतो, धूप इत्यादि द्रव्यांचा परिमल पसरतो, त्यावेळीं पिशाच्चबाधा असलेल्या लोकांच्या अंगांत संचार होतो आणि ते लोक ( प्रत्येक पुरुष व स्त्री ) आपलीं पूर्व कर्में सांगून श्रीचे परवानगीनें कृष्णेंत मुक्ति घेतात. त्यावेळीं समंधाबद्दल समूळ नास्तिकपणा नाहींसा होऊन देवाच्या आस्तित्वाबद्दल खात्री होते...

हें क्षेत्र जरी लहानसें आहे तरी ह्या ठिकाणीं म्युनिसिपालिटी आहे. तिचें दरसालचें उत्पन्न १८०० रुपयांचें आहे. या ठिकाणीं एक मुलांची व एक मुलींची व एक शास्त्र पढण्याची अशा तीन शाळा आहेत. व या ठिकाणीं १८१९ सालीं व्याख्यानमाला नामक संस्था स्थापित झाली आहे. व तिचे उत्पादक अत्रस्थ विद्यार्थी व कांहीं येथीलच पण आंग्लविद्या अर्जनार्थ परस्थ असलेले विद्यार्थी आहेत. हें एक देशोन्नतीला कारण आणि या गांवास भूषण आहे. ह्या गांवच्या पूर्वेकडील तट अगदीं मोडकळीस आलेला आहे. तेव्हां म्युनिसिपालिटी व श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर ह्यांनीं तिकडे लक्ष पोंचवावें, अशी माझी त्यांस नम्रतापूर्वक प्रार्थना आहे.

ह्या ठिकाणीं ( मौनी स्वामी ) पूर्वीं रहात असून त्यांनीं बारा वर्षें मौनव्रत धारण केलें होतें. त्यांचें सर्व लोकांवर व त्यांत विशेषेंकरून लहान मुलांवर फारच प्रेम होतें हे जेव्हां समाधिस्त झाले त्यावेळीं ह्यांचें वय सुमारें एकशें दोन वर्षांचें होतें असें ह्मणतात. या गोष्टीस दोन तीनच वर्षें झालीं.

लोकवस्तीच्या मानानें पाहिलें असतां येथें विद्वान् लोक बरेच आहेत. पूर्वीं वे० शा० सं० रामभाऊ कवीश्वर ह्मणून एक गृहस्थ होते, ते पौराणिक विद्येंत निपुण असून हे आपल्या रसाळ वाणीनें व गंभीर शब्दांनें पुराण सांगूं लागले ह्मणजे ऐकणारे लोक पांचशें असोत किंवा हजार असोत सर्वांस स्पष्ट ऐकावयास जात असे. यानीं ( अग्निष्टोम ) या नांवाचा यज्ञ

केला होता. ह्या यज्ञास पुष्कळ गांवचे लोक आले होते. व त्यांनीं त्यांस उदार आश्रयही दिला. हा समारंभ विन बोभाट सात दिवस चालला होता. त्यावेळेस रोज भोजनास सुमारें दहा हजार पान होत असे. ह्या अन्नदानाच्या प्रभावानें ह्यांची कीर्ति दिगंतरीं दुमदुमूं लागली त्यांस कैलासवास होऊन सुमारें चार वर्षे झालीं. हल्लीं त्यास एक पुत्र आहे त्यांचें वय सुमारें ३९ वर्षांचें आहे. तेही वडिलाप्रमाणें आपलें नांव गाजवितील अशी आशा आहे.

## श्रीदत्तात्रयाजवळील नित्यक्रम.

रोज सकाळीं सुमारें ४ वाजतां हक्कदार पुजारी स्नान करून देवाची काकडआरती करण्यास येतो, त्यावेळीं फारसी दाटी नसते. गांवांतील अतिशय भाविक लोक व परगांवचे पहाण्यास आलेले कांहीं लोक एवढेच काय ते असतात. ह्या वेळेपासून शेजारच्या गांवचा स्त्रीपुरुषांचा समुदाय स्नानास जमतो. काकडआरती झाल्यावर पादुका उघड्या असतात. आणि त्यावर मंत्रघोषयुक्त लोकांचे अभिषेक सुरू होतात. त्यावेळीं कित्येक लोक सोंवळ्यानें पादुकांवर पाणी घालितात, कित्येक नमस्कार घालितात, कित्येक कापूर धूप इत्यादि देवापुढें जाळितात, कित्येक प्रदक्षिणा घालितात, कित्येक भोंवतालच्या कमानींतून गुरुचरित्राचीं पारायणें करितात, कित्येक जप करितात, कित्येक नैवेद्य आणितात, कित्येक तीर्थ अंगारा मागतात, कित्येक स्नानें करितात त्यांस भट संकल्प सांगतात, कित्येक घाटावर संध्या करितात, कित्येक नमस्कार घालितात, कित्येक बहुत दिवसांनीं भेटलेल्या मित्राशीं प्रेमपूर्वक भाषण करितात, कोणी शतपावली करितात, कोणी पुराण ऐकतात, कित्येक स्त्रिया आपापल्या मैत्रिणींबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी बोलत उभ्या असलेल्या दृष्टीस पडतात, कित्येक सुपवायनें देतात, कित्येक सुवासिनींची ओटी भरितात, कित्येक हळदकुंकू लुटतात. या प्रकारचा जनसमूह आपापल्या कर्तव्यांत गुंतलेला असा देखावा एकदम दृष्टीस पडतांच मनाची एक प्रकारची भावना होऊन अंतःकरण सद्गदित व आश्चर्य आणि आनंदभरित होतें.

असा प्रकार सायंकाळपर्यंत चालतो; परंतु दोन प्रहरच्यावेळीं सुमारें ३।४ तास दाटी कमी असते. कधीं कधीं हरदासाचें कीर्तन, वेश्यांचें किंवा गव-

यांचें गायन इत्यादि प्रकार चालतो, त्यावेळीं सर्व घाट भरून व गजबजून जातो. नंतर संध्याकाळीं आरती होऊन रात्रीं १० च्या सुमारास शेजारती होते.

दर शनिवारीं व पौर्णिमेस श्रीची महापूजादि बांधून रात्रीं पालखी मिरवितात. याशिवाय कोणत्याही दिवशीं भक्तलोक हौसेनें किंवा नवसामुळें महापूजा बांधवून पालखी मिरवितात. प्रथम धूपारती झाल्यावर लागलीच पालखी निघते. पालखींत अलंकार घालून उत्सवमूर्ती ( मुखवटा आणि श्रीच्या पादुका ) बसवितात आणि देवालयाच्या सभोंवतीं फिरवितात. ह्यावेळीं देवालयाभोंवतालचा सर्व प्रदेश मनुष्यानें भरून जातो, आणि पालखींतील मूर्तीचें दर्शन घेण्याकरितां बरीच धक्काबुक्की होते. पालखी मिरवितांना प्रत्येक प्रदक्षिणेच्या वेळीं ४ चार जागीं पालखी उभी करितात. त्यावेळेस मागें दिलेलीं पदें म्हणतात आणि पद संपूर्ण होतांच दत्तनामाचा गजर करून पालखी पुढें चालवितात. याप्रमाणें तीन प्रदक्षिणा झाल्यावर नंतर मंत्रपुष्प करितात. नंतर उत्सवमूर्ती मोठ्या समारंभानें पुजारी स्वहस्तें घेऊन वर नियमित जागीं ( नारायण स्वामींचे देवालयांत ) नेऊन ठेवितात. नंतर तीर्थ अंगारा सर्व लोकांस देतात. नंतर वैदिकांचा मंत्रघोष होतो आणि मग शेजारती होते.

चातुर्मास्यामध्यें पालखी बंद असते ती पुन्हा दसऱ्याच्या दिवशीं सुरू होते. नदीस पूर आला म्हणजे सर्व देऊळ पाण्यानें बुडून जातें. त्यावेळीं श्रीचे मुख्य पादुकांची पूजा होत नाहीं. वरच्या बाजूस नारायणस्वामींच्या देवळांत उत्सवमूर्तीची पूजा बांधून तेथें सर्व उपचार करितात व तेथेंही पाणी आलें म्हणजे उत्सवमुर्ति गांवांत आणून तेथेंही नित्य नेमाप्रमाणें पूजा करितात.

येथें संसारास त्रासून मनाच्या शांतीकरितां कांहीं लोक येतात आणि चतुर्थाश्रम म्हणजे ( संन्यास ) घेतात. संन्यास घेतलेल्या लोकांचा समुदाय या पुण्यक्षेत्रीं रहाण्यास आलेला पुष्कळच आढळतो व त्यांचा सत्कारही येथें चांगला होतो.

## वर्षांत नेमलेल्या दिवशीं उत्सव होतात ते.

**विजयादशमी**—या दिवशीं पालखीमध्यें उत्सवमूर्ति आणि श्रीच्या पादुका बसवून मोठ्या समारंभानें श्रीकृष्णा व पंचगंगा यांच्या संगमाच्या रस्त्यावरील ( अश्वत्थ ) वृक्षाजवळ आपटा पूजन करून सीमा उल्लंघन क-

रून पालखी परत आणितात. त्यावेळेस नागरिक स्त्रिया अलंकारयुक्त अश. आरत्या घेऊन श्रीस ओंवाळण्याकरितां वाटेनें दुतर्फा उभ्या असतात. हा देखावा मोठा रमणीय दिसतो.

**गुरुद्वादशी**—या ठिकाणीं केवळ मुख्य महत्त्वाचा दिवस आश्विन वद्य १२ हाच होय. या दिवशीं येथें मोठें ब्राह्मणभोजन होतें. पात्र सुमारें बारा हजारपर्यंत होतें. या दिवसाच्या प्रसादाचें माहात्म्य मोठें आहे. अनेक जातींचे, अनेक पंथांचे, अनेक धर्मांचे लोक ह्या प्रसादास येतात. हा सर्व खर्च देवाचे स्थाईक उत्पन्नांतून होतो व हा सर्व समारंभ चिंच वृक्षादि सुशोभित असलेल्या अशा सुंदर बनांत होतो. भोजनास बसलेला समुदाय श्रीगुरूचें नाम घेऊन एकदम हर्षयुक्त असा गजर करितात. त्यावेळेस जो मनास मोठा आनंद होतो त्याचें वर्णनच करवत नाहीं. ह्या वेळेस बनाचे सभोंवतीं पुष्कळ अन्य जातीचे लोक प्रदक्षिणा घालितात. असा हा चमत्कारिक देखावा पाहिल्यावर मनाची भावना कशी होईल याची कल्पना वाचकांनींच करावी. या प्रसादास येणाऱ्या यात्रेकरूंस एक आणा कर द्यावा लागतो व त्या रकमेची व्यवस्था कमेटीमार्फत होते.

**आषाढी पौर्णिमा**—या दिवशीं व्यासपूजा होते व संन्याशांस फराळास घालून त्यांस भगवीं वस्त्रें देतात.

**श्रावणी पौर्णिमा**—या दिवशीं सर्व ब्रह्मवृंद घाटावर श्रावणी करितात. तेव्हां एकादा मोठा यज्ञसमारंभ चालला आहे कीं काय असा भास होतो.

**माघ वद्य ५**—या दिवशीं गोपाळकाला होतो. प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत जागर असतो व धूप मध्यानरात्रीं शिरोळचे पाटील कुळकर्णी हे आल्यानंतर घालितात. या पांच दिवसांत त्यांचा मान असतो. या पांच दिवसांत बनांत मुक्तद्वार ब्राह्मण भोजन होतें. प्रतिपदेस इलाच ( गुरुप्रतिपदा म्हणतात ) या दिवशींचें प्रसादाचें प्रयोजन वे० शा० सं० रा० रामकृष्ण नारायण पुजारी हे २१३ वर्षांपासून लोकाश्रयावर करितात हें त्यांस मोठें भूषण आहे. दोन दिवस जगद्गुरु मठ संकेश्वर यांचेकडून होतें व एक दिवस करवीर सरकार यांचेकडून होतें आणि ५ पंचमीस जगद्गुरु मठ संकेश्वर यांचेकडून ( झुणका भाकरी ) असते. सायंकाळीं ( ५ ) वाजतां कीर्तन होऊन हांडी फोडितात; त्यावेळेस श्रीमंत छत्रपती सरकार करवीर यांचेकडून पांच ( तोफांचे ) बार होतात, नंतर मानकरी लोकांस नारळ वांटतात.

**महाशिवरात्र**—या दिवशीं गुरुद्वादशीप्रमाणेंच मोठी यात्रा भरते.

**कन्यागत**—बारा वर्षांनीं कन्याराशीस गुरु येतो तो एक वर्षपर्यंत असतो त्यास " कन्यागत " असें ह्मणतात. त्या दिवशीं श्रीची पालखी मोठ्या समारंभानें शुक्ल तीर्थास जाते. तेथें श्रींस स्नान घालून पुण्याहवाचन करितात. मनुष्यसमुदायही फारच जमतो. या मुदतींत भागीरथी कृष्णेस येते अशी समजूत आहे ह्मणून कन्यागताच्या वर्षी पात्रसाळ्याखेरीज इतर दिवशीं अतिशय यात्रा भरते व पुष्कळ लांबलांबचे लोक येतात. कित्येक पुजारी यजमानास सत्कारपूर्वक आणण्याकरितां सामोरेही जातात. यात्रेकरितां आलेल्या लोकांपैकीं ज्यांचा पिता मृत झाला असेल ते लोक महानदी कृष्णाबाईचें दर्शन झाल्याबरोबर क्षौर करून नंतर श्राद्ध, गंगाराधना वगैरे कृत्यें विधिपूर्वक करितात. या कन्यागतांत पुष्कळ सकेशा विधवा केशवपन करण्याकरितां येथें आणितात.

आली सिंहस्थ पर्वणी ॥ न्हाव्या भटा झाली धणी ॥

तुकाराम

या न्यायानें कृष्णेकांठच्या हक्कदार ( जोशी वगैरे ) लोकांची या वेळीं मोठी धांदल होते.

याशिवाय दत्तजयंति, नरसिंहजयंति, इत्यादि आणखी कांहीं उत्सव व मुख्य मुख्य सणाचे दिवशींही कांहीं उत्सव होतात.

श्रीनरसिंहसरस्वती हा आवतार श्रीपादश्रीवल्लभानेंच घेतला असें श्रीगुरुचरित्रावरून सिद्ध होतें. श्रीचे पुजाऱ्यांची संख्या पुष्कळ असून अन्य धंदा कांहीं न करितां या श्रीगुरूंच्या दर्शनास येणाऱ्या लोकांपासून होणाऱ्या मिळकतीवरच केवळ निर्वाह करून आहेत

श्रीनरसिंहसरस्वती वाडीस बारा वर्षे राहून नंतर गाणगापुरास गेले. श्रीगुरु वाडीस आल्यावर एका औदुंबराच्या वृक्षाखालीं राहिले. तो वृक्ष शके १७७९ सालीं कृष्णेस महापूर आला. त्यावेळीं हा जुनाट वृक्ष वाहून गेला. हल्लीं तेथें ( श्रीच्या मागील बाजूस ) दुसरा एक औदुंबराचा वृक्ष उत्पन्न झाला आहे. श्रीगुरुदत्तात्रयाचा उत्सव सदोदित चालावा ह्मणून विजापुरच्या बादशहाकडून औरवाड आणि गौरवाड अशीं दोन गांवें इनाम मिळालीं तीं अद्यापि चाललीं आहेत. शिवाय करवीर सरकारांतूनही कां-

हीं उत्पन्न चालू आहे. पुजाऱ्यांस देवाच्या पुढील उत्पन्न दरसाल सुमारें ३।४ हजार रुपयेपर्यंत असून देवदर्शनास येणाऱ्या यजमानांकडून प्राप्ति होते ती वेगळीच. याशिवाय कन्यागताच्या सालीं जे यजमानकृत्य करितात त्यांस वरीच मिळकत होते.

श्रीगुरु ( नरसिंहसरस्वती ) नरसिंह वाडीस आल्यावर ह्या स्थानाचें माहात्म्य विशेष वाढलें. या ठिकाणीं श्रीगुरूची स्वारी एक तप ( बारा वर्षें ) वास्तव्य करून आणि शेवटीं जे लोक भक्तिपूर्वक दर्शनास किंवा सेवेस येतील त्यांचे मनोरथ पूर्ण होतील इत्यादि सांगून श्रीगुरुदत्तात्रयांची स्वारी गाणगापुरास गेली.

**कृते जनार्दनो देवो त्रेतायां रघुनंदनः ॥**
**द्वापारे रामकृष्णश्च कलौ श्रीपादवल्लभः ॥ १ ॥**

---

## पुस्तककर्त्याची श्रीदत्तचरणीं विनंति.

**पद —चाल—**( लीन चरणीं दीन आह्मी झालों जगदंबे. )

**पावदत्तादावसत्ताआपुलीप्रभुराया ॥ आपुली प्रभुराया ॥ दत्तचरणींलीनआण्णाविनवीयतिराया ॥ ध्रु० ॥ पटवर्धनकुलिंजन्मघेउनी । राजकुलांनटवी ॥ सांगलिग्रामींसुराज्यन्यायें । लोकांनासुखवी ॥ वडिलागतजेसुमार्गधर्मी । कित्तातोगिरवी ॥ हेरंबाचेध्यानिंसदातो । मानसतेंरिझवी॥चाल॥वंदितों॥प्रार्थितों॥हेंतवपाया॥ हेंतवपाया ॥ धुंडिराजहासपुत्रकरुनिदावप्रभुमाया ॥ पावदत्ता० ॥ १ ॥ दक्षिणप्रांतींभूपविग्रहा । एकचिमजदिसतो ॥ एकवचनीनियमितकालीं । कार्यें नोकरितो ॥ अन्नदानींख्यातीमोठी । डंकागाजवितो ॥ दुर्भिक्षाचे समयींआपुल्या । प्रजेससुखविंतो ॥ चाल ॥ येपरी ॥ अंतरीं ॥ ठेवीममाय ठेवीममाया ॥ इच्छितसत्वरिदेशिलह्मणुनीपडतोंतवपाया ॥ पावदत्ता० ॥ २ ॥ सांगलिग्रामींहेरंबाचा । उत्सवबघण्याला ॥ देशोदेशिंचेलोकयेतिते । पावतिसौख्याला ॥ उत्सवथाटापाहुनि प्रभुच्या । गातीकीर्तीला ॥ हेरंबाचाअवतारचिहा । शोभादेमहिला ॥**

चाल ॥ त्रिशुलधरा ॥ सव्यकरा ॥ नृपवररक्षाया ॥ नृपवररक्षाया भूपतिआमुचाचिरायुठेवीमागेंहेंसदया ॥ पावदत्ता० ॥ ३ ॥ वाईग्रामींकृष्णाउत्सव । संस्थामनिंधरिली ॥ परमार्थाच्यारूपेंयुक्ति । गुरुंनीं दावियली ॥ भूपतिचरणींमानपत्रिका । विनयेंअर्पियली ॥ सदयहोउनीसाह्यकरावें । कीर्तीहीआपुली ॥ चाल ॥ दंडधरा ॥ पद्मधरा ॥ मुनिवरसुरवंद्या ॥ मुनिवरसुरवंद्या ॥ श्रीपादश्रीनरहरगुरुवर धांवचियासमया ॥ पावदत्ता० ॥ ४ ॥

ग्रंथ संग्रहालय, वाई.

समाप्त.

गेले.
...र्गी राहिले. तो वृक्ष
...ळी हा जुनाट वृक्ष वाहून
...मरा एक ... ...ाचा वृक्ष
मदोदित चालावा ह्मणून
...ों दोन गांवें इ-
...तूनही कां-

घाल ॥ त्रिशुलधरा ॥ सव्यकरा ॥ नृपवररक्षाया ॥ नृपवररक्षाया भूपतिआमुचाचिरायुठेवीमागेंहेंसदया ॥ पावदत्ता० ॥ ३ ॥ वाडीग्रामींकृष्णाउत्सव । संस्थामानिंधरिली ॥ परमार्थाच्यारूपेंयुक्ति । गुरुंनीं दावियली ॥ भूपतिचरणींमानपत्रिका । विनयेंअर्पियली ॥ सदयहोउनीसाह्यकरावें । कीर्तीहीआपुली ॥ चाल ॥ दंडधरा ॥ पद्मधरा ॥ मुनिवरसुरवंद्या ॥ मुनिवरसुरवंद्या ॥ श्रीपादश्रीनरहरगुरुवर धांवचियासमया ॥ पावदत्ता० ॥ ४ ॥

मंथ …शालय
ठाणे

समाप्त

गेले.
राहिले. तो वृक्ष
ळीं हा जुनाट वृक्ष वाहून
रा एक राचा वृक्ष
मदोदित चालावा ह्मणून
शीं दोन गांवें इ-
तूनही कां-

## श्रीमंत ·गली सरकार यांस आह्मी दिलेल्या मानप·

॥ श्रीगजाननप्रसन्न. ॥

## ·मंत धुंडिराज चिंतामण उर्फ तात्यासाहेब ·
## सांगली श्रीमंतांचे से·

· आण्णाजी कृष्ण पूजारी नरसिंहवाडीकर, विष्णु रघुनाथ आणि मंडळीचा म्यान· ·ऱ्या वर्तानें **श्रीमंतांचे चरणीं** हें मानपत्र सादर करीत आहें. त्याचा स्वीका· ·शी विनंती आहे.

·ह्मीं **श्रीक्षेत्र नरसिंहवाडी** येथील **श्रीकृष्णेचा** उत्सव होत असलेला त्यास कांहींच उत्पन्न नसल्या कारणानें आज चार वर्षे बंद पडला आहे; त्याचें पुनरुज्जी· ·त त्यास कांहींतरी कायमचें उत्पन्न करून ठेवावें ह्या उद्देशानें " **श्रीदत्तगुरुप· ·सागर** " या नांवाचें पुस्तक काढून, त्याच्या पुष्कळशा प्रती लोकांत खपवून, ·ा खर्च वजा जातां बाकी राहिलेल्या उत्पन्नांतून सदरहू उ·ाकरितां कांहींतरी उत्पन्न करून ठेवण्याचें योजिलें आहे; व सदरहू पुस्त·· खप व्हावा ह्या उद्दे· ·स्तकें घेणारांस कांहीं बक्षिसेंही ठेविलीं आहेत.

·आजचा हा **श्रीमंतांचा वाढदिवसाचा समारंभ** पाहून, सर्व लोकांस आ· आहे. व हा समारंभ स्थापन करून लोकांना आपला आनंद **श्रीमंतांचे चरणीं** ·दर्शित करण्याची ही अमोल्य सोय जाहली आहे व ह्याबद्दलचें सर्व श्रय **रावबहादूर कारभारी साहेब मोहनीराज एकनाथ** यांसच आहे. व ह्याबद्दल सर्वांनीं त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

आह्मीं **श्रीमंतांचे राजधानीचे शहरीं** आमचें ऑफिस आणल्यापासून, **श्रीमंतांचे** पुण्याईनें या शहरीं आमच्या संस्थेचा चांगल्या प्रकारें उत्कर्ष होत आहे, व लवकरच तिला याहीपेक्षां चांगलें स्वरूप मिळून **श्रीमंतांच्या राज्यांत** आमचे हेतु **श्रीगुरुदत्त कृपेनें** लवकरच पूर्ण होतील अशी आशा आहे. व **श्रीमंतांस** आयुरारोग्य ·· मिळून **श्रीमंतांस** अनुरूप असें **पुत्ररत्न** व्हावें, अशी आमची **श्रीगुरुदत्तच·तीभूपावप्र**·हों ·आहे.

**नोकरितो ॥ अन्नदा·**
**समयींआपुल्या । प्रजेससुख·**
**वीममाय·· ठेवीममार·**
**पाया ॥ पावदत्ता· ॥ ·**
**॥ देशोदेशिंचेलोक·**
**प्रभुच्या । ·**

आपला आज्ञाधारक,
**आण्णाजी कृष्ण पुजारी वाडीकर.**
**म्यानेजर विष्णु रघुनाथ आणि मंडळी.**
श्रीगुरुदत्तपदामृतसागर ऑफिस, **सांगली.**

## ॥ श्रीकृष्णाबाई प्रसन्न ॥

घाल ॥ त्रि

भूपतिआमुच कांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, आह्मी श्रीक्षेत्र नरसि

ग्रामींकृष्णा तालयाचे संनिध घाटावर माघ शुद्ध ७ पासून पौर्णिमेपर्यंत श्री

रुनीं दा प्रति वर्षास करणार आहों.

दयद्रो कारण पूर्वी या ठिकाणीं " श्रीकृष्णाबाईचा " उत्सव कैलासवा

ध स० बाळशास्त्री दीक्षित हे पुढारी होऊन नऊ दिवस ब्राह्मणभोज रिकीर्तन वगैरे करीत होते. ते कैलासवासी झाल्यानंतर पुढें त्यांचे मंडळी जमून करीत होती; परंतु आलीकडे ५।४ वर्षें झालीं; " श्री उत्सव " यासंबंधानें नियमित उत्पन्न कांहींच नसल्या कारणानें बंद पडला आहे. परंतु अशा क्षेत्राचे ठिकाणीं आणि त्यांतून श्री पुण्यपावन महानदीचा उत्सव न होणें ही मोठी लाजिरवाणी गोष्ट अ ध्यांत आणून सर्वांस विनंतिपूर्वक कळविण्यांत येतें कीं, वाई, कऱ्हाड काणीं जसे लोकाश्रयावर श्रीकृष्णाबाईचे उत्सव होतात तसा वाडीसही मनांत आणून आह्मी वरील तीर्थीस श्रीकृष्णाबाईचा उत्सव मोठ्या समा दिवस ब्राह्मणभोजन व रात्रौ हरिकीर्तन वगैरे करण्याचा व तो प्रतिव ळीतपणें चालावा ह्मणून कायमचें उत्पन्न करून ठेवण्याचा विचार के परंतु हा उत्सव सदोदित चालण्यास सुमारें निदान पांच हजार रुपये लागत...

आतां ... एवढी मोठी रक्कम जमण्यास लोकाश्रयच पाहिजे. करितां राजे रजवाडे, ... इनामदार वगैरे थोर लोक व प्रत्येक गांवांतील पाटील कुळकर्णी, सभ्य लोक आदिकरून सर्व दत्तभक्त लोक ह्या सत्कृत्यास आपला उदार आश्रय देऊन उत्सवाचें पुनरुज्जीवन करून अन्नदान केल्याचें पुण्य घेतलि अशी आशा धरून हें विनंतिपत्र देशबांधवांस सादर केले आहे. तरी ह्याचा स्वीकार करून श्रीकृष्णाबाईचे उत्सवास मदत करितील अशी आशा आहे.

...यानें त्याचें पुनरुज्जीवन करून अन्नदान केल्याचें पुण्य

पत्र-

गुरुवर

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक ६००

लेखक

पुस्तकाचें नांव श्री गुरुदेव महात्म्य

सन